इयत्ता : बारावी [ STD. XII ]

# मराठी (१०९) [ Marathi - 109 ]

## नमुना उत्तर-पत्रिका तथा गुणदान नियोजन :२०१९-२०२०

Model answer paper & Marking scheme: 2019-2020

समय : ३ तास — एकूण अंक : ८०

## विभाग अ : आकलन

प्रश्न १:अ)

१) विद्यार्थ्यांच्या जीवनाच्या दृष्टीने हे चांगले नाही की त्यांच्या शिक्षणात भाषा व साहित्य नाही.

२) मुलांच्या शिक्षणामागे केवळ 'करिअर'चा दृष्टीकोन ठेवल्याने - मुलांना पगारदार गुलाम बनवतोय.

३) भाषेच्या अभ्यासामुळे - आपली स्वत:ची ओळख करून घेण्याची संधी मिळते.

❖ प्रत्येक अचूक आणि पूर्ण वाक्यातील उत्तर : १ गुण

प्रश्न १ आ]

१) पहिली ते दहावीपर्यंत मराठी हा विषय असला तरी अकरावीच्या पुढे 'मराठी' भाषा हा विषयाचा आग्रह नाही.विज्ञान आणि वाणिज्य शाखेकडे जाणाऱ्यांना मराठी व साहित्य असा विषय घेण्याची संधीच नाकारली आहे. विद्यार्थी व पालकांवर 'मराठीची गरज नाही.' या मताचा प्रभाव टाकण्यात आला आहे.

२) भाषेच्या माध्यमातून ती भाषा बोलणाऱ्यांच्या अनेक पिढ्यांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा साठा त्या भाषेत असतो. भाषेच्या लेखी व तोंडी साहित्याच्या द्वारे मूल्यांची अभिवृत्ती होते. या प्रकारे संस्कृतीची वाहक होते.

❖ सर्व योग्य मुद्दे, स्वत:ची भाषा, शुद्ध लेखन यानुसार

प्रत्येक योग्य उत्तर : ०२ गुण.

प्रश्न १ इ )

१)साहित्य आणि कला मानवी संवेदना जागवते. आपल्याबरोबर इतरांचेही जीवन आनंदी बनवण्याचा संस्कार मनावर होतो. त्यामुळे साहित्य व कला यांच्या अभ्यासामुळे समाजात कर्तव्यदक्ष अधिकारी, न्यायासाठी झटणारे वकील, समाजातील गरीब आणि गरिबी यांची जाण असणारे डॉक्टर, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी झटणारे शिक्षक, समाजाच्या योग्य विकासासाठी विचार आणि प्रयत्न करणारे व्यापारी, उद्योगपती निर्माण होतील. समाजजीवन सुंदर होईल.

❖ सर्व योग्य मुद्दे, स्वत:ची भाषा, शुद्ध लेखन यानुसार

प्रत्येक योग्य उत्तर : ०३ गुण.

प्रश्न २ अ)

१) अंधाराचे युग संपावे यासाठी .. गरीब श्रीमंत यांतील अंतर कमी करावे.

२) 'सरस्वती'साठी चारही कवाडे उघडली पाहिजेत, म्हणजे .. सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे .

❖ योग्य पर्यायासह अचूक उत्तर : प्रत्येकी १ गुण

प्रश्न २ आ)

१) संपत्ती राजमार्गाने / न्यायमार्गाने आली पाहिजे.

२) 'तुला आहे, मला नाही' ही समाजातील विषमता, असे वाटणे थांबले पाहिजे.

३) प्रत्येकाचे स्वप्न, कल्पना यांचा तीर गाठला पाहिजे.

❖ प्रत्येक योग्य /अचूक उत्तर : १ गुण

## विभाग : ब [लेखन]

प्रश्न ३)

१. अंधश्रद्धा : एक सामाजिक कीड

२. स्त्री : कुटुंबाचा आधार

३. सार्वजनिक स्वच्छता : माझे कर्तव्य

४. हसणे म्हणजे मानवाला मिळालेले वरदान

❖ प्रत्येक विषयाला अनुसरून योग्य व आकर्षक सुरवात / प्रस्तावना - - २ गुण
❖ विषयाशी संबंधीत आवश्यक ते सर्व मुद्दे - - २ गुण
❖ शुद्ध आणि योग्य भाषा, व सादरीकरण [ परिच्छेद इ.] - २ गुण
❖ भाषा सौंदर्य [ विषयानुरूप काव्यपंक्ती, वाक्प्रचार,म्हणी इ.चा वापर.] - २ गुण

प्रश्न ४ अ] संवाद - लेखन

. 'पाण्याची कमतरता आणि आपले कर्तव्य'

विनू : काय रे गणू , सुट्टीला गावी गेला नाहीस ?

गणू : अरे, गावात नाही पाणी. सगळी विहिरी आटल्यात. पियाला पाणी नाही ; मग बाकीचं सोडच !

विनू : होय का ? झाडांची कत्तल, ग्लोबल वार्मिंग .. याचाच हा परिणाम.

.... अशा प्रकारे दोघांचा संवाद.

या संवादातून -- ‘ तोंड धुताना/ दाढी करताना नळ चालू न ठेवणे, रोज गाडी धुण्याऐवजी पुसून घेणे, ‘शावर बाथ’ न घेणे, पावसाचे पाणी टाकीत साठवणे, झाडे लावणे ... इत्यादी उपाय उपयोगात आणणे या कर्तव्यांची माहिती संवाद रूपाने येणे आवश्यक.

यानुसार -

- शीर्षक : १ गुण
- संवादात्मक लेखन, योग्य भाषा व विरामचिन्हांचा वापर - २ गुण
- आवश्यक ते सर्व मुद्दे - २ गुण .

अथवा

ब] वृत्त-लेखन

- वृत्ताचा मथळा / शीर्षक - ½ गुण
- घटनेचे स्थान व दिनांक - ½ गुण
- आवश्यक ते सर्व मुद्दे, [उदा. मुख्य कार्यक्रम कोठे, मुख्य पाहुणे, पाहुण्यांचा मुख्य संदेश,कार्यक्रमासंबंधी विशेष माहिती इ.] - २ गुण
  योग्य भाषा, अचूक लेखन,परिच्छेद इ. - २ गुण

## विभाग : क [व्याकरण ]

प्रश्न ५ अ)

१) उद्‌गारवाचक वाक्य - वा:! किती सुंदर आहे तिचा आवाज !

२) होकारार्थी वाक्य - तुकाराम भित्रा होता.

३) कर्तरी प्रयोग - ती पटणीची भाकरी करते.

४) वर्तमानकाळात वाक्य - तू आमच्या घरी जेवतेस ?

५) कर्मणी प्रयोग - मानसीने गणिताचे पेपर सोडवले.

६) भविष्यकाळात वाक्य - देशात निवडणुका सुरु होतील.

- कोणतीही चार उत्तरे
- प्रत्येक योग्य व अचूक उत्तर : २ गुण

प्रश्न ५ आ)

i) वचन बदलून ..

१. - ख] माझ्या गावात प्राचीन मंदिरे आहेत.

२. - क] ते फुलझाडाचे रोप होते.

३. - ग] बाबूरावांनी यंत्रमानवाला आज्ञा दिल्या.

❖ योग्य पर्यायासह कोणतीही २ उत्तरे,

❖ अचूक आणि पूर्ण वाक्यात आवश्यक : प्रत्येकी १ गुण.

ii) वाक्प्रचारांच्या अर्थाचा योग्य पर्याय -

१. पोटात कावळे ओरडणे. = ख] भुकेने व्याकूळ होणे.

२. तोंड भरून बोलणे. = क] खूप स्तुती करणे.

३. भाऊबंदकी असणे. = ख] भावाभावांत भांडण असणे.

❖ योग्य पर्यायासह कोणतीही २ उत्तरे,

❖ अचूक आणि पूर्ण वाक्यात आवश्यक : प्रत्येकी १ गुण

प्रश्न ५ इ)

क] मोकळेपणाने

आज खूप दिवसांनी आईसोबत मोकळेपणाने गप्पा मारल्या.

ख] बरोबर

तू बरोबर केलेस.

ग] हसत हसत

दीपा हसत हसत म्हणाली, " मी तर वेडीच आहे."

❖ दिलेल्या शब्दाचा क्रियाविशेषण म्हणून योग्य व अचूक उपयोग असावा.
[अर्थात नाम, विशेषण, अथवा शब्दयोगी अव्ययाप्रमाणे उपयोग नसावा.]

❖ योग्य उत्तर : प्रत्येकी १ गुण.

प्रश्न ५ उ)

१. विशेषण - तल्लख

२. तुकारामला पाहुण्याने हसतच विचारले.

३. विशेष नाम - बिलीमोरा

४.भडाभडा - क्रियाविशेषण

५. मी बुटाची लेस सोडण्याचा प्रयत्न केला, पण / परंतु थंडीमुळे मला ते शक्य झाले नाही.

६.वाक्यातील सर्वनाम - आपण

७. आकाशवाणी हे घराघरापर्यंत पोचलेले मध्यम आहे.

८. अधोरेखिताचे भाववाचक रूप वापरून वाक्य -- साऱ्या वर्गात शांतता होती .

❖ कोणतीही ५ उत्तरे आवश्यक.

❖ दिलेल्या सूचनेप्रमाणे योग्य उत्तर. आवश्यक तेथे पूर्ण वाक्यात .
❖ प्रत्येकी योग्य व अचूक उत्तर : १ गुण.

## विभाग : ड [ गद्य - पद्य विभाग ]

प्रश्न ६ अ]

१] लेखक निरंजन घाटे यांची कथा 'अति काळजीचे परिणाम'... तंत्रज्ञानाच्या अति आहारी जाण्याने कसे दुष्परिणाम होतात याचे विनोदी शैलीतून लेखन .

बाबुरावांना नातू झाला ... बाळाला सर्वांपेक्षा आगळीवेगळी भेट म्हणून एक यंत्रमानव भेट...'बाळाची योग्य काळजी न घेतल्यास मोडीत काढण्याची' बाबुरावांची धमकी..

यंत्रमानवाने बाळाला कशामुळे अपाय होऊ शकतो याची माहिती घेतली... त्यानुसार ... धुराने वायुप्रदूषण, हॉर्नमुले ध्वनिप्रदूषण ... बाळाला त्रास होईल म्हणून बंगल्याच्या दारात गाडी आणण्याची बंदी ... कुत्र्याचेही तोंड बांधून ठेवले... स्वयंपाकघरात फोडणी देण्यास बंदी...आईला बाळाला जवळ घेण्यास मनाई .. दूध पाजण्यासही मनाई.. आईला कोणताही संसर्गजन्य आजार नाही याची सर्टिफिकेट मागितली. परिणामी बाळ उपाशी !

अशा तक्रारी ....

२] लेखिका गिरीजा कीर यांचे 'माझ्या आयुष्याची गोष्ट' हे आत्मचरित्र...... मुरुड येथे वास्तव्य ....तेथील समुद्राशी जवळीक..... लेखनाची प्रेरणा .... हे लेखिका सांगते.

लहानपणापासून कोल्हापूरचा रंकाळा, पंचगंगा, वाडीची कृष्णामाई परिचयाच्या... मुंबईचा समुद्र,चौपाटी भेळ आणि मसाला पानपट्टीपुरती माहितीची. मुरुडला समुद्राशी मैत्री.. अजगरासारखा पडलेला, काठावर रुपेरी मऊ वाळू .. एकाबाजूला नाबाबसाहेबांचा बंगला.. दूरवर कासाचा किल्ला ..या सर्वांचे अप्रूप .. चांदण्यारात्री तो अथांग समुद्र पाहताना अभूतपूर्व शांतता जाणवत ... मन निरामय ... समुद्राच्या पुढे येणाऱ्या लाटा यश, आत्मविश्वास महत्त्वाकांक्षेचे प्रतिक ... मागे जाणाऱ्या लाटा अपयश, पराभव पचवणारी शक्तीचे प्रतिक .. हा समुद्र माणसाच्या मनाचे प्रतिरूप .. या समुद्राच्या सोबतीने आधार .. स्वत:शी संवाद साधता येऊ लागला.. विचारांना दिशा .. काव्यात्म वृत्ती जागली ..

अशा प्रकारे समुद्राची अनेकविध रूपे, लेखनाची प्रेरणा देणारा हा समुद्र वेगळा जाणवला.

३] लेखक रवींद्र पिंगे यांचा 'ज्याचं त्याचं नंदनवन' हा एक ललित लेख. .. प्रयेक व्यक्तीची सर्वात प्रिय , स्वर्गीय सुख देणारी अशी एक कल्पना/इच्छा असते. ही इच्छाच त्या व्यक्तीसाठी जणू 'नंदनवन' असते.

फ्रामरोझ हा वाराणसीचा ९१ वर्षाचा वृद्ध पारशी .. मुंबईत स्थायिक .. मुली शिकून आपापल्या व्यवसायानिमित्त परदेशात ... फ्रामरोझ एकटाच ... आर्थिक स्थिती उत्तम ... क्लबमध्ये

समजले मोठ्या इस्पितळात डॉक्टर, नर्स, आया मिळतात पण हाताखाली काम  करायला मुले नाही .. रुग्णसेवेसाठी फ्रामरोझच्या मनाने साद घातली ... हॉस्पिटलमध्ये  काम करण्याची इच्छा व्यक्त .. काम सुरु ..

अशा प्रकारे गरजवंताला मदत करण्याचे .. रुग्णसेवेचे प्रिय काम फ्रामरोझ करू लागले. याच जीवनात नंदनवन लाभले .

४] 'भुताचा जन्म' ही द.मा.मिरासदार यांची एक विनोदी कथा... या कथेतून मनात अंधश्रद्धा कशा घर करून असतात .. यातूनच भुताचा जन्मही कसा होता हे विनोदी ढंगाने ....

तुकाराम पैलवान गडी .. पण भुताला घाबरणारा.. गुंडगुळ्याच्या माळावरून संध्याकाळचा घरी निघालेला .. अमावस्येची रात्र .. सोबतीला एक पाव्हणा भेटला ... तुकाराम भूतांची भीती वाटते म्हणत भूतांचेच किस्से सुरु .. पाव्हण्याला त्याच्या भुताच्या भीतीची मजा वाटत ... काही वेळाने एका पिंपरणीखाली विसाव्याला ... तुकाने चंची सोडून पान खाल्ले .. काही वेळाने आता पुढे निघण्यासाठी शेजारी पाहिले तर पाव्हणा जागेवर नव्हता ... घाबरला .. पाव्हणा म्हणजे 'भूत'च समजून पळतच गाव गाठले ... भूताशी कुस्ती करून आल्याची गोष्ट रंगवून सांगितली ...

पाव्हणा बिडी पेटवण्यासाठी झाडाच्या आडोशाला .. काही वेळाने पाहिले तर तुका जागेवर नाही ... तोही घाबरला .. 'भूत'च भेटल्याची खात्री .. गुरासारखा ओरडत वस्तीवर ..

अशा प्रकारे अमावास्येच्या रात्री भूत दिसते ही अंधश्रद्धा, भिती, आणि गैरसमज यातून भुताचा जन्म झाला.

- पाठ परिचय / प्रस्तावना ..
- आवश्यक ते सर्व मुद्दे
- योग्य भाषा, शुद्ध लेखन  ,
- उचित समारोप ..

हे मुद्दे लक्षात ठेऊन प्रत्येकी ५ पैकी गुण [ कोणतीही २ उत्तरे ]

ब]

१] चीनी शिपायांनी डोग्रा जवानाच्या हातातील घड्याळासाठी त्या जवानास मारले.

२] अभियंत्याच्या मते ध्वनिप्रदूषण टाळून शांत वातावरणात वाढवणं ही नातवासाठी चांगली भेट ठरेल.

३] आपण मुलांना फुलांची देतो, पण मिस्टर उन्नीकृष्णन यांच्या पत्नीने फुलानांच आपली मुले मानले यातच तिचे लोभस वेगळेपण जाणवते.

४] मानसीचा मोठा भाऊ केवळ दीड मार्क कमी पडल्याने 'बोर्डात' येऊ शकला नाही हा अनुभव लक्षात घेऊन कोणत्याही कारणाने मानसीची बोर्डात येण्याची संधी जाऊ नये म्हणून रानडे पती-पत्नी ...... एवढी दक्षता घेत होते.

❖ पूर्ण वाक्यात योग्य उत्तर : प्रत्येकी १ गुण

प्रश्न ७ अ]

१] कवी कुसुमाग्रजांची 'आवाहन' ही कविता १९६२च्या भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवर ... परकी आक्रमणाच्या काळात मायभूमीच्या रक्षणासाठी सर्व देशवासीयांनी तयार असावे असे आवाहन ...

कवी म्हणतात, आम्ही संख्येने कोटी-कोटी आहोत पण आमचे मनगट एकच आहे. प्रत्येकाच्या मनगटातील कणखरपणा, जिद्द एकच आहे. कोटी-कोटी शरीरे पण सर्वांची एकच इच्छा एकच ..ती म्हणजे पिवळ्या सापाला , चिन्यांना ठेचण्याची . विजय मिळेपर्यंत शांत बसायचे नाही,.. हीच सर्वांची प्रतिज्ञा ..

अशा प्रकारे एकतेची भावना ...

२] जेष्ठ व श्रेष्ठ कवयित्री शांता शेळके .. स्त्रीच्या विविध मनोभावना कवितेतून ... 'खांब' या कवितेतून स्त्रीचे घरातील महत्त्वपूर्ण मध्यवर्ती स्थान स्पष्ट ...

स्त्री लग्नानंतर सर्वस्वी नव्या घराला, त्याघरातील माणसांना आपले मानते .. आपले दु:ख, रडणे आतल्याआतच / मनातच ठेवते ... घरभर वाऱ्याप्रमाणे .. सर्वांच्या मदतीला .. आल्यागेल्याचे स्वागत ..आजाऱ्याची  रात्रभर सेवा .. पहाटे उठून पुन्हा कामाला सुरुवात .. रात्रंदिवस विनामोबदला कष्ट ... जणू तिला लग्नात अन्य काही नसेल पण,आपलं मानलेल्या घरच्यांच्यासाठी राबण्याचीच जहागीर मिळालेली असते.

स्त्रीच्या शारीरिक , मानसिक सामर्थ्याचा गौरव करण्यासाठीच कवयित्री म्हणतात ...

३] मराठी साहित्य क्षेत्रातील विंदा करंदीकर हे एक श्रेष्ठ कवी .. 'या जन्माला फुटे न भाषा' या कवितेतून संयमित प्रेमभाव व्यक्त ...

आपल्या मनातील प्रेम व्यक्त करण्याचे ठरवून भेट .. तीच आतुरता तिच्या डोळ्यांतही .. भेटल्यावर नको त्या चर्चा .. हसणे खिदळणे .. पण मनातले भाव ओठांवर नाही .. जणू मुकेच झाले .. दोघेही .. निदान पुढच्या जन्मी तरी व्यक्त होणे जमेल का हीही शंकाच ..

याप्रकारे संयमित भाव व्यक्त ...

४] कवी फ. मु. शिंदे यांची कविता ' बहरतील मळे' ... दुष्काळाचे चित्रण .. त्याही परिस्थितीही आशावादी विचार व्यक्त ...

आभाळ कोरडे .. भूमीची लेकरे आसवे गळतात .. निसर्ग निष्ठुर .. पण तरीही शेतकरी.. या जमिनीच्या पोटातील झरे वाहतील .. पुन्हा एकदा सुकत असलेले मळे बहरतील या आशेवर आपल्या वावरासाठी, ओसाड होत असलेल्या माळरानासाठी झुंज देत राहतो.

शेतकऱ्याच्या जीवनातील .. मनातील आशावाद व्यक्त करण्यासाठी ....

❖ कवितेचे नाव , मध्यवर्ती कल्पना / प्रस्तावना ..

- उत्तराचे आवश्यक ते सर्व मुद्दे
- योग्य भाषा, शुद्ध लेखन ,
- उचित समारोप ..

  हे मुद्दे लक्षात ठेऊन प्रत्येकी ४ पैकी गुण [ कोणतीही २ उत्तरे ]

ब]

१] समरदेवता बोलावते आहे .. समरपुरच्या वारकऱ्यांना

२] स्वप्नात मागे कुणी जल्लाद धावत आहे असे दिसले की,- तुला धावता येत नाही .

- योग्य पर्यायासह कोणतीही २ उत्तरे,
- अचूक आणि पूर्ण वाक्यात आवश्यक : प्रत्येकी १ गुण

इ] पुढील काव्यपंक्तींचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. ( कोणतेही दोन) (६)

१] नारळ कठीण दिसे | भितरी खोबरें अरुवार |
तैसे साधूचे अंतर | बोधे वोसंडले ||

सुफी संप्रदायातील संत कवी शेख महंमद यांचा 'अभक्ताची ओळख' हा एक अभंग.. नित्य परिचयाच्या उदाहरणांतून भक्त - अभक्त यांचा परिचय..

या पंक्तीत कवी म्हणतात .. नारळ वरून कठीण पण आत मऊ कोमल स्निग्ध खोबरे .... तसाच साधू .. वरून कर्मकांडामुळे कठोर .. पण अंतरंग बोधाने, ज्ञानाने, उपदेशामृताने ओसंडत असतो .

नारळाचे उदाहरणाने साधूचा, भक्ताचा परिचय ..

२] आला पिकाले बहार झाली शेतामधी दाटी
कसे वाऱ्यानं डोलती दाने आले गाडी गाडी

बहिणाबाई चौधरी यांची 'देव अजब गारोडी' ही एक कविता .. शेतात पेरणी झाल्यापासून पीक तयार होईपर्यंतचे सुंदर वर्णन ..

धरणीच्या कुशीत बीजबियाणे .. वरून शाल पांघरावी तशी माती .. काही दिवसांतच अंकुर... काही दिवसांनी देवाला धन्यवाद देण्यासाठी हात जोडावा तशी चिमुकली पाने ... दिसामाशी पीक वाढते... बहर येतो .. आणि एक दाणा पेरल्याच्या बदल्यात गाडी भरू दाणे येतात..

अशी ही निसर्गाची , देवाची किमया .. खानदेशी बोलीतील या कवितेत कवयित्रीची सूक्ष्म निरीक्षण शक्ती .. काव्यात्मकता .. व्यक्त होते.

३] असा कसा मुकाच झालो ! चर्चा केली नको नको ती;
हास्याच्या उठल्या लहरी, पण मनात लपले मनचे मोती.

कवी विंदा करंदीकर यांची 'या जन्माला फुटे न भाषा' ही एक सुंदर कविता... मनातील प्रेमभाव

ओठांपर्यंत येतो पण व्यक्त होत नाही याचे सुंदर वर्णन ..

मनातली भावना व्यक्त करण्याच्या इराद्याने भेट .. भेटीत नको त्या विषयावर चर्चा.. हास्य-विनोद झाले ..पण प्रेमभाव व्यक्त करता नाही आला... जणू मुके बनलो.. मनातील प्रेमभावनेचे मोती शब्दांवाटे बाहेर नाहीच .. ते मोती मनातच ..

कवीने संयमित प्रेमभाव सुंदररीत्या व्यक्त... मनातील त्या प्रेमभावनेला पाणीदार मोत्यांची उपमा अप्रतिम ..

४] आता या विशाल औद्योगिक शहराच्या मर्यादा
तुझ्याप्रमाणेच मलाही भासू लागल्याहेत छोट्या

कवी लोकनाथ यशवंत हे आधुनिक जगातील एक .. 'नव्या शहराविषयी' ही त्यांची एक कविता .. औद्योगिक क्रांती .. गावे पसरली .. शहरांचा विस्तार .. पण शहरातील माणूस .. 'जात्यावर बसले की ओवी सुचते' असे मागच्या पिढीचे विचार .. आपले कष्टाचे काम करतानाही भावना व्यक्त करता येतात.. कामात आनंद घेता येतो .. पण आज पुष्कळ बोलायचे असले तरी मोकळेपणाने बोलता येत नाही .. कारण आजचा समाज संकुचित वृत्तीचा ..

म्हणूनच कवी म्हणतो .. या विशाल शहराच्या मर्यादा छोट्या भासतात .. या ओळीतून समाजाच्या संकुचित वृत्तीमुळे अस्वस्थ कविमनाचे चित्रण ..

- प्रस्तावना - [कवी,कविता, कवितेची मध्यवर्ती कल्पना] - १ गुण
- आवश्यक मुद्दे [दिलेल्या पंक्तींचा सरळ अर्थ, कवीचा भाव, वैशिष्ट्ये इ.] - २ गुण
  आणि योग्य समारोप -